**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रातल्या सर्व २८५ नगरपालिकांच्या निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबरला करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाचे आदेश /२२२ नगरपालिकांसाठी उत्साहात मतदान

- मतदार याद्यांचं पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन संसदेत गदारोळ, लोकसभेचं  कामकाज दिवसभरासाठी स्थगित.

- मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयकाला राज्यसभेचीही मंजुरी

- रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या आगामी भारत भेटीत अनेक करार होण्याची शक्यता /दोन्ही देशातला व्यापार २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्स होणार

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ५०४ अंकांची घसरण

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं दिले आहेत. सुरवातीच्या कार्यक्रमानुसार या सर्व जागांसाठी आज मतदान होणार होतं, मात्र न्यायालयीन अपील झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये २० डिसेंबरला मतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला. यामध्ये २४ नगराध्यक्ष आणि २०४ सदस्यांच्या जागांचा समावेश आहे.

सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत, अन्यथा २० डिसेंबरला निवडणूक होणाऱ्या जागांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठासमोर आली होती. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयानं सर्व ठिकाणचे निकाल २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले. या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० डिसेंबरचं मतदान संपल्यानंतर अर्धा तासानं जाहीर करता

येतील, आणि निवडणूक आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

राज्यातल्या २२२ नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज उत्साहात मतदान झालं.

**<><><><><>**

घोषित केलेल्या निवडणुका पुढं ढकलल्या जात आहेत, हे यंत्रणांचं अपयश असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. यावर आपण याआधीही नाराजी व्यक्त केल्याचं त्यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

तर न्यायालयाच्या या आदेशामुळे निवडणुकीचा खेळखंडोबा झाला असून, याला राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आजच्या दुसऱ्या दिवशी मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा मुद्दा दोन्ही सभागृहात गाजला. या विषयावर तातडीनं चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज वारंवार तहकूब झालं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी शांततेचं आवाहन केल्यानंतरही विरोधक चर्चेसाठी आग्रही राहिले. त्यामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी दोननंतर, तर राज्यभेत आजचं नियोजित कामकाज झाल्यावर सभागृह दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

त्याआधी सखोल पुनरीक्षणावर तातडीनं चर्चा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षांनी लावून धरली. लोकशाही आणि नागरिकांच्या हितासाठी ही चर्चा होणं गरजेचं आहे, असं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

तर विरोधकांच्या घोषणाबाजीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना नाराजी व्यक्त केली. सरकार सर्व विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी तयार आहे. मात्र सगळ्या चर्चा आत्ताच व्हाव्यात हा विरोधकांचा अट्टाहास आणि संसदेच्या कामकाजात अडथळा आणणं बरोबर नाही असं रिजिजू म्हणाले.

**- होल्ड बाईट किरेन रिजीजू - -**

**<><><><><>**

मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक आज राज्यसभेत मंजूर झालं. या विधेयकामुळे आता मणिपूर वस्तू आणि सेवा कर कायदा, २०१७मध्ये सुधारणा होणार आहेत. राज्यसभेत अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी हे विधेयक मांडलं. या विधेयकावरच्या चर्चेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, या विधेयकामुळे मणिपूरमध्ये व्यवसाय करणं सुलभ होणार आहे. वस्तु आणि सेवांच्या पुरवठा साखळी आणखी मजबूत व्हायलाही या कायद्याची मदत होणार असल्याचं त्या म्हणाल्या. हे विधेयक लोकसभेत आधीच मंजूर झालं आहे.

**<><><><>**

वंदे मातरम या गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने येत्या ८ डिसेंबर रोजी लोकसभेत विशेष चर्चा होणार आहे. त्यानंतर ९ डिसेंबर रोजी निवडणूक संदर्भातल्या सुधारणांवर लोकसभेत चर्चा होईल, अशी माहिती केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज संसद भवनात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं रिजिजू म्हणाले. या दोन्ही चर्चा राज्यसभेतही घेण्याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे.

**<><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या आगामी भारत भेटीत दोन्ही देशांदरम्यान अनेक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या जाण्याचा अंदाज आहे, असं रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेसकोव्ह यांनी दिल्लीत आयोजित दूरस्थ पत्रकार परिषदेत सांगितलं. एस -४०० ही क्षेपणास्त्र प्रणाली आणि एस यू -५७ हे लढाऊ विमान हे पुतिन यांच्या दौऱ्यात चर्चेचे मुख्य मुद्दे असतील, असं ते म्हणाले. भारतातून आयात वाढवण्याच्या शक्यतांवर रशियाचे अध्यक्ष विचार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. सध्या ६३ अब्ज डॉलर्स असलेला दोन्ही देशातला व्यापार २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्स होईल, असं त्यांनी सांगितलं. अमेरिकेनं भारतावर लादलेलं आयात शुल्क हे दबाव टाकण्यासाठी असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ५०४ अंकांची घसरण झाली आणि तो ८५ हजार १३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १४४ अंकांची घसरण होऊन तो २६ हजार ३२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेच्या वित्त आणि पत धोरण समितीची द्वैमासिक बैठक उद्यापासून सुरु होईल. येत्या शुक्रवारी बैठक संपल्यावर गव्हर्नर संजय मल्होत्रा पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करतील.

या आधीच्या दोन आढाव्यांमधे व्याजदरात बदल झालेला नाही. यावेळी पाव टक्के कपात होण्याची शक्यता तज्ञ वर्तुळात व्यक्त होत आहे.

**<><><><><>**

देशात करनिर्धारणातली पारदर्शकता प्रशासकीय सुधारणांच्याही पुढे राहिलेली आहे. असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत १८ व्या ग्लोबल फोरममध्ये बोलत होत्या. करनिर्धारण सुटसुटीत आणि पारदर्शक असल्यामुळे स्वेच्छेनं करभरणा करण्याला प्रोत्साहन मिळतं, करबुडवेपणामुळे महसुलात तूट येते आणि त्यामुळे विकासावरही प्रतिकूल परिणाम होतो असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज वाराणसी इथं काशी तमिळ संगमम उपक्रमाच्या चौथ्या आवृत्तीचं उदघाटन केलं. काशीमधल्या नमो घाटावर आयोजित या कार्यक्रमात तामिळनाडूतून आलेले चौदाशेहून अधिक प्रतिनिधी भाग घेत आहेत. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन हे देखील यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्तानं शुभेच्छा दिल्या आहेत. या कार्यक्रमामुळे एक भारत श्रेष्ठ भारत ही भावना आणखी दृढ होईल, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

चैत्यभूमीवर उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात एक समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत ते बोलत होते. महापरिनिर्वाण दिनासाठी सुरक्षेसह सेवा सुविधांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

देशातल्या महामार्गांवर दूरसंचार आधारित सुरक्षा प्रणाली बसवण्यासाठी एन एच ए आय अर्थात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाने रिलायन्स जियोसोबत करार केला आहे. चालकांना वेग आणि वाहन चालवण्याच्या पद्धतीबद्दल माहिती देऊन रस्ते सुरक्षा पुरवणं हे या कराराचं उद्दिष्ट आहे, असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं म्हटलं आहे. या प्रणालीमुळे चालकांना मोबाईल फोनवर एसएमएस किंवा व्हॉट्स अप अथवा  कॉलद्वारे सूचना मिळतील.  जिओचं सीमकार्ड वापरणाऱ्यांसाठी ही व्यवस्था उपलब्ध असेल.

**<><><><><>**

जयपूर इथे सुरू असलेल्या खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये मुंबई विद्यापीठाच्या बॅडमिंटन संघाने उपविजेतेपद मिळवलं आहे. पंजाबच्या चित्कारा विद्यापीठाबरोबर झालेल्या अंतिम सामन्यात मुंबई विद्यापीठाला रौप्य पदक मिळालं. मुंबई विद्यापीठाच्या बॅडमिंटन संघात अभ्युदय चौधरी, झाकुओ सेयिए, अथर्व जोशी, क्रिश देसाई, इयान लोपेझ, सारांश गजबिये आणि सिद्धार्थ दास यांचा समावेश आहे.

**//<><><><><>//**